मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत

# येशू पाच हजारांना जेवू घालतो



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest
Alastair Paterson

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तो कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

पुष्कळ धर्मपुढारी लोक (ज्यांना परुशी असे म्हणत) येशू विषयी खोट्या गोष्टी सांगत असत. काहींनी तर त्याला मारण्याचा देखिल प्रयत्न केला.



तो खरोखर देवाचा पुत्र आहे यावर त्यांचा विश्वास नव्हता. तो देवाचा पुत्र आहे
हे सिध्द् करणारे चमत्कार त्याने केले
तरी देखिल त्यांनी त्याचा
स्विकार केला
नाही.



एके दिवशी, येशू गालील समुद्राच्या पलिकडे गेला. खरेतर, त्याच्या अवतीभोवती असणाऱ्या गर्दी पासून त्याला काही वेळा एकांत हवा होता. परंतु लोकांनी लवकरच तो कुठे आहे याचा शोध केला. येशूने महान चमत्कार केले आहेत हे त्यांना माहित होते. त्यांना येशू संगती राहावेसे वाटत होते.



येशू डोंगरावर जाऊन आपल्या शिष्यांसह तेथे बसून शिकवू लागला. अधिकाधिक लोक येत राहिले. लवकरच संध्याकाळच्या जेवणाची वेळ झाली. सगळ्यांना भूक लागली असणार.



येशूने लोकसमुदायाकडे पाहिले. व फिलिप्पाला विचारले, "ह्यांना खावयाला आपण भाकरी कोठून विकत आणाव्या?" जवळपास विकत घेण्यासाठी दुकाने देखिल नव्हती. येशूची काय करण्याची योजना होती?





फिलिप्पाने त्याला उत्तर दिले, "काहीतरी नवल विशेष घडले तरच या लोकसमुदायाला आपण जेवण देऊ शकू." येशू आणि त्याच्या शिष्याजवळ पुरेसे पैसे नव्हते.





अंद्रिया (शिमोन पेत्राचा भाऊ) नावाचा दुसरा एक शिष्य येशूला म्हणाला, "येथे एक लहान मुलगा आहे, त्याच्याजवळ जवाच्या पाच भाकरी व दोन मासळ्या आहेत..."

"... परंतु त्या इतक्यांना कशा पुरणार?" जरी त्या लहान मुलाने त्याचा जेवणाचा डब्बा येशूला दिला तरी ऐवढेसे अन्न ऐवढ्या मोठ्या लोकसमुदायाला कसे पुरणार हे अंद्रियाने पाहिले नव्हते.



येशूने म्हटले, "लोकांना बसवा." मग तेथे जे सुमारे पाच हजार पुरुष होते ते बसले. व्वाव ! पाच हजार ! यांत तेथे उपस्थित असलेल्या स्त्रीया आणि लेकरे यांची मोजणी करण्यात आली नाही.



त्यानंतर येशूने, त्या भाकरी व मासळ्या घेतल्या. त्या लहान मुलाने येशूवर विश्वास केला असावा. येशूला त्याचे जेवण का हवे आहे किंवा हे जेवण घेऊन येशू काय करणार आहे याची त्याला काहि कल्पना नसावी. त्याला कदाचित असे वाटले असावे, "जर मी माझे जेवण येशूला देऊन देईन, तर माझ्याकडे खाण्यासाठी काही नसणार." परंतू तरी देखिल त्याने ते येशूला देऊन दिले.



त्यानंतर, येशूने प्रार्थना केली. त्याने देवाचे आभार मानले. पाच भाकरी आणि दोन मासळ्या? होय ! येशूने देवपित्याला, "आभार मानतो" असे म्हणून ते अन्न आशिर्वादित करण्याची प्रार्थना केली.



प्रार्थना झाल्यावर, येशूने त्या भाकरी मोडल्या आणि त्या भाकरी व मासे शिष्याना दिले, त्यांनी त्या मोठ्या जमावात ते वाटून दिले. येशूने केलेला हा चमत्कार तेथील लोकांनी अनुभवला. प्रत्येक व्यक्ति भरपूर जेवला आणि तरी देखिल ते जेवण संपले नाही.



सर्व जण तृप्त झाल्यावर देखिल, तेथे पुष्कळ मासळ्या आणि भाकरी उरलेल्या होत्या. येशूने शिष्यांना सांगितले की, "काही वाया जाऊ नये म्हणून उरलेले तुकडे गोळा करा." तेंव्हा त्यांनी खाऊन उरलेले तुकडे गोळा केले आणि ते बारा टोपल्या भरले.



एका लहान मुलाकडे असलेल्या जेवणाने, त्या दिवशी, येशूने पाच हजार पेक्षा अधिक लोकांना जेवू घातले. दुसऱ्या वेळेस त्याने ४,000 पेक्षा अधिक लोकांना सात भाकरी व काही मासे यांनी जेवू घातले.



जेंव्हा सर्वसामान्य लोकांनी हे पाहिले, तेंव्हा त्यांना परुशी लोकांप्रमाणे राग आला नाही. त्याऐवजी, "जगात जो संदेष्टा येणार आहे तो खरोखर हाच आहे." असे ते म्हणाले. देवाच्या पवित्र वचनात ज्या तारणाऱ्याविषयी अभिवचने दिली आहेत तो येशू हाच आहे
हे लोकांना माहित होते.



येशू पाच हजारांना जेवू घालतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

योहान ६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.